## प्रकरण २ - ब - सद्गुरूची निवड

प्राचीन काळी जिज्ञासू शिष्य ज्ञान मिळविण्यासाठी, ब्रह्मज्ञान जाणणा-या ऋषींकडे, अतिशय नम्रभावनेने जात असत. हे गुरु आपल्याला सर्व काही सांगतील अशी दृढ भावना, श्रध्दा मनात ठेऊन त्यांच्याकडे जात. या शिष्यांच्या हाती वाळलेल्या समिधा असत. वाळलेल्या समिधा ज्या-प्रमाणे अग्नीत टाकल्या असता अग्नीशी तात्काळ समरस होऊन जातात तशा शिष्याच्या चित्तवृत्ती गुरुशी एकरूप होऊन जात असत. गुरुशी समरस होण्याचे प्रतीक म्हणजेच या वाळलेल्या समिधा होत. गुरुकडे जाताना शिष्याला शिरोव्रत यथाविधी आचरावे लागे. शिष्यभाव धारण करून गुरूला शरण जावे लागे. ब्रह्मज्ञानात पारंगत अशा गुरुची निवड करावी लागे. त्याना ज्ञानासंबंधी शंका विचारुन आपली जिज्ञासापूर्ती करावी लागे.

शौनको ह वै महाशालोऽङ्गिरसं विधिवदुपसन्न: पप्रच्छ।
कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवतीति [१२]

सुकेशा च भारद्वाज: शैब्यश्च सत्यकाम:।
सौर्यायणिश्च गार्ग्य: कौसल्यश्चाश्वलायनो भार्गवो
वैदर्भि: कबन्धी कात्यायनस्ते हैते ब्रह्मपरा
ब्रह्मनिष्ठा: परं ब्रह्मान्वेषमाणा एष ह वै तत्सर्वं
वक्ष्यतीति ते ह समित्पाणयो भगवन्तं पिप्पलादमुपसन्ना:।[१३]

शौनक तसेच सुकेशादि महा शिष्य, आर्ततेने व तळमळीने अनुभवात्मक ज्ञान सांगण्यास समर्थ अशा मुनींकडे ज्ञानार्जनासाठी आले आहेत.

गुरुंची पूजा करुन त्याना वंदन करुन ते म्हणतात -

त्वं हिन: पिता यो ऽ स्माकमविद्याया: पारं पारं तारयसीति ।[१४]

ज्ञानलालसा निर्माण झालेला शिष्य गुरुकडे जातो. आपले अज्ञान प्रांजळपणे प्रकट करतो. ज्ञानेच्छा पूर्ण करणारा गुरु आपल्याला अविद्येच्या पैलतीरावर पोहोचवणार असल्याची त्याला खात्री असते. जो आपले अज्ञान दूर करुन ज्ञानाचा प्रकाश देतो त्याला तो सद्गुरुचे ठायी मानून, मनोभावे त्यांची सेवा करुन नम्रतेने, प्रेमाने वागून त्यांच्याकडून ज्ञानप्राप्ती करुन घेतो.

सद्गुरु हा देवापेक्षा श्रेष्ठ होय. कारण देव हे मानवनिर्मित आहेत. भक्तानी त्याला देवपण आणलेले आहे. पण सद्गुरु निर्विकल्प आहे. देवापेक्षा कोटीपटीने अधिक व परिपूर्ण आहे. म्हणून सद्गुरुकृपाप्राप्त झालेला शिष्य आत्मज्ञानाच्या बळावर सृष्टीतल्या वैभवाला कस्पटासमान मानतो. तो स्वत:च सद्गुरुस्वरुप बनतो.

महाराष्ट्रातील अनेक संतानी गुरुकृपेचा अनुभव दिला व घेतला आहे. एकनाथांचे गुरु जनार्दनस्वामी व भगवान दत्तात्रेय, तर ज्ञानदेवांचे गुरु निवृत्तीनाथ.-

ज्ञानेश्वर भक्तीयोगात म्हणतात - " जे जे भेटे भूत तया मानी भगवंत" सर्वभूतात्मभाव या संतानी शिकविला. एकनाथानी दत्तात्रेयाचा अनुग्रह घेतला तर शिवाजी महाराजांनी रामदास स्वामींचा. या रामदासानी

आसेतु हिमालय यात्रा करून स्वत: अनुभव घेतला. नंतर उपदेश केला. प्रत्यय, प्रयत्न, प्रचीती याना महत्व दिले. रामदासांच्या कृपेने शिवाजी महाराजांना स्वराज्य प्राप्तीत मदत झाली.

ऋग्वेदात सत्याचा शोध व सत्याचे संरक्षण करण्यासाठी देवतांची उपासना करण्यात आली. त्या सत्याचे संरक्षण व संवर्धन या संतानी मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, समर्थ रामदास, दासोपंत इ. नी मोठ्या प्रमाणात केले. सद्गुरु निवडून, त्याची सेवा करून आपले उद्दिष्ट साधणारे संत जसे नंतरच्या काळात आढळले तसे पूर्वीच्या काळात देखील ऋषीमुनींच्या स्वरूपात आढळत. हे ऋषीमुनी अरण्यात, एकांतात रहात असत. तपाचरण करून ज्ञान साधना करीत असत. ब्रह्मतत्व जाणण्याचा, जग, संसार इ. संबंधी ज्ञान करून घेण्याचा प्रयत्न करीत असत. या ज्ञानसाधनेतून त्याना आत्मसाक्षात्कार होत असे. आत्मज्ञान-प्राप्ती होत असे. अशा ज्ञानी लोकांना एकत्र आणण्यासाठी पूर्वीच्या काळी विद्वत्सभा आयोजित केल्या जात असत. ज्ञानी राजे यज्ञाच्या निमित्ताने या विद्वानांना एकत्र बोलवीत. त्यांच्यात वादविवाद, संभाषण, चर्चा होत असे. त्यातून एकमेकांच्या ज्ञानातील कमी-जास्तपणा कळून येई. आपल्यापेक्षा जो विद्वान, अधिक ठरेल त्याचे शिष्यत्व पत्करून त्याच्या-कडून आपले अपुरेज्ञान पूर्ण करण्याचा कल दिसून येतो.

या ठिकाणी एक गोष्ट दिसून येते, ती अशी - विद्वानांच्या मध्ये आपापसात मत्सर, द्वेष भावना नसे. ज्ञानाच्या क्षेत्रात स्पर्धा असली तरी निकोपवृत्ती होती. अधिकाधिक ज्ञान मिळविण्याची लालसा प्रत्येकाला जरी असली तरी एकमेकांना आपले ज्ञान देण्याची प्रामाणिक इच्छा-ही त्यांच्यात होती. त्यामुळे ज्ञानवृध्दी चांगल्याप्रकारे होई. आपलेअज्ञान

प्रकट करण्याची लज्जा वाटत नसे. प्रांजळपणे ते इतर विद्वानाना सांगत आणि त्यांच्याकडून शिष्यभावनेने ज्ञानप्राप्तीकरुन घेत. उपनिषादातही अशी उदाहरणे आढळतात.

एकदा जनक राजाने यज्ञ केला. यज्ञाच्या निमित्ताने विद्वान ब्राह्मणाना सोने नाणे, संपत्ती, गायी इ. वस्तू दान दिल्या जात असत. जमलेल्या ब्राह्मणात विद्वान कोण आहे ते त्याला पाहायचे होते म्हणून तो म्हणतो -

"तान्होवाच ब्राह्मणा भगवन्तो यो वो ब्रहिमष्ठः स
एत गा उदजतामिति। [१५]

तेव्हा याज्ञवल्क्य पुढे येऊन त्या गायी नेऊ लागतो. तेव्हा इतर विद्वानांच्या बरोबर त्याचा वादविवाद होतो. अश्वल, जरत्कारु या पुत्र आर्तभाग, लाहयायन भुज्यु, कहोल, उद्दालक, गार्गी इ. नी त्याला विविधप्रश्न विचारले. शेवटी सर्वांच्या प्रश्नाना यथायोग्य उत्तरेदेऊन याज्ञवल्क्याने आपले सर्वश्रेष्ठत्व सिध्द केले. स्वतः जनक राजाचे ज्ञान अपूर्ण असल्याने त्याला [याज्ञवल्क्य] गुरुस्थानी मानले व त्याच्याकडून पूर्ण ब्रह्मज्ञान प्राप्त करुन घेतले.

उपनिषाद काळातील राजेलोकही जिज्ञासू होते. त्यांच्याकडे ही काही वेळा ऋषीमुनीपेक्षाही अधिक ज्ञान असल्याचे आढळते.

काशीचा राजा अजातशत्रु, ब्रह्मविद्येत निष्णात होता. गार्ग्यगोत्रातील "बालाकि" बरोबर त्याचा संवाद झाला. त्यातून "बालाकि" ला कळून आले की, ब्रह्मज्ञानात आपण अपूर्ण आहोत. मग तो

अजातशत्रूला शिष्यभावाने शरण गेला. त्याच्याकडून पूर्णब्रह्मज्ञान करून घेतले.

अशा त-हेने सद्गुरु निवडून प्रत्येक शिष्य आपले ज्ञान पूर्णत्वाला नेण्याची प्रथा त्याकाळात होती. सद्गुरु देखील नम्रशिष्याला, अधिकारी शिष्याला आपले ज्ञान देण्यात स्वतःला धन्य मानत.

--- x ---